# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १३२९/२०२३

**तक्रारकर्ता, श्री.विनीत शाह**
५०३, वंदना गॅलक्सी, नारायण शाळेजवळ
टेंबा रोड, भाईंदर (प), जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर हानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर हानगरपालिका,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १७.०२.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०५.२०२२ | -- | २८.०६.२०२२ | २८.०६.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि. ०३.१०.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही "* असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १७.०२.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय रा.वाकडे, प्रभारी प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" Information on Action taken on Appeal no १७,१८,१९,२०,२१,२२,२४,२५,२६,२७/२०१८ hearing conducted on ०७.०२.२०२० Order passed, information provided*

*१) Indicate daily progress made on Appeals no.१७, १८,१९, २०, २१, २२, २३, २४, २५, २६, २७/२०१८ & hearing conducted on ०७/०२/२०२०.*

*२) Copy of Minutes of hearing of said all Appeals conducted on ०७/०२/२०२० along with first appellant authority, PIO, Asst PIO, name designation, their order to act as FAA, PIO, ass PIO present at time of hearing.*

*३) Copy of Order passed against १st Appeal, receiving sign of applicant of order received of all said appeals else reason recorded for not providing information along with action taken on responsible officers.*

*४) Reasons recorded & Action taken report for not providing information after passing of ८०० days of hearing conducted, along with all responsible FAA, PIO, officers their designatin, department. Aolong with GR mentioning time limit for information to be provided against १st appeal.*

*५) All information to be provided asked in all १st Appeals mentioned.*

*६) Duties & Function of commissioner, additional comm, deputy comm, asst comm, education officer as per RTI act, GR, citizen charter to act on information to be provided in RTI, १st appeal filed, implementation of १st appeal order passed."*

तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तक्रारकर्ता यांना माहिती पुरविल्याबाबतचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी हे सुनावणी दरम्यान सादर करु शकले नाहीत. यावरुन तक्रारकर्ता यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती देण्यात आलेली नाही, असे दिसून येते. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार

अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना उपलब्ध माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर हानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०६.०५.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०५.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ फेब्रुवारी, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी,
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर हानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव,
दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१. **यांचेमार्फत रवाना.**

राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक ०५.०५.२०२५ ( In Continuation of order dt.१०.०२.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.१०.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचे स्पष्टीकरण सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०५.०५.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत सोनारे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रभारी प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी तक्रारकर्ता यांनी असे निवेदन केले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत सोनारे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत. त्यांनी तक्रारकर्ता यांना माहिती पुरविणेबाबत झालेल्या विलंबाबातचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यांना खुलासा सादर करण्याकरिता एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आपला लेखी खुलासा सादर करणे योग्य होईल.

तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील तक्रारकर्ता यांना माहिती पुरविलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. प्रस्तुत प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भारत सोनारे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्ता यांना माहिती पुरविणेस झालेल्या विलंबाबातचा कोणताही खुलासा सादर केला नाही. त्यांना एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी त्यांचा लेखी खुलासा स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०६.०५.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशानुसार माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.०६.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०५ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भारत सोनारे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प),
ता.जि.ठाणे ४०१ १०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे,
प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर हानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव,
दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१. **यांचेमार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक ३०.०६.२०२५ ( In Continuation of order dt.०५.०५.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.०५.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी दि.३०.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत लक्ष्मण सोनारे तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय रा.वाकडे, प्रभारी प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत लक्ष्मण सोनारे, प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.२६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आपला लेखी खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, ते शिक्षण विभागात कार्यरत असताना अपिलार्थी यांनी त्यांचेशी संपर्क साधल्यानंतर त्यांनी अपेक्षिलेली माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु शिक्षण विभागात सदर माहिती उपलब्ध नसल्याने त्यांना जा.क्र.मनपा/शिक्षण १७/२०२१-२२, दि.२०.०१.२०२२ अन्वये माहिती उपलब्ध झाल्यास ४५ दिवसात आपणांस माहिती देण्यात येईल असे लेखी पत्राने कळविण्यात आले होते.

त्यांनी आपल्या खुलाश्यामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी अपेक्षिलेली माहिती सन २०१८ या कालावधीतील असल्याने, सदर कालावधी विचारात घेता त्यावेळी श्री.सुरेश देशमुख, प्रशासन अधिकारी, श्री.भास्करराव बाबर, शिक्षणाधिकारी व श्रीम.दिपाली पवार-जोशी प्रभारी शिक्षणाधिकारी तथा समाज विकास अधिकारी होते व सदर कालावधीत शिक्षण विभागात श्री.हिरा सोलंकी, लिपीक व श्रीम.प्राची मुकणे, लिपीक हे सहा.जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. कार्यालयातील नस्ती व कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे कार्यकाळातील असल्याने उपलब्ध झाले नाही. संबंधित नस्ती, कागदपत्रे व इतर फाईल्स उपलब्ध होत नसल्याने आपण आयुक्त यांना दि.१३.१०.२०२१ रोजी लेखी टिपणी सादर करुन श्रीम.उर्मिला पारधे, तत्कालीन शिक्षणाधिकारी यांचे बदली नंतर त्यांचे जागेवर आलेल्या नविन शिक्षणाधिकारी/प्रभारी शिक्षणाधिकारी, उपायुक्त, शिक्षण यांचेकडे फाईल, नस्ती व कागदपत्रे हस्तांतरित केले नसल्याने कार्यालयीन कामकाजात अडचण होत असल्याने त्यांचेकडून संबंधित फाईल, नस्ती व कागदपत्रे हस्तांतरण करुन घेणेकरीता टिपणीद्वारे सादर करुन कळविले होते. तथापि ही कागदपत्रे आपणास जून २०२२ पर्यत उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती देणे शक्य झाले नाही. श्री.भरत सोनारे यांचेकडे अशी विचारणा केली असता की, तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती जे अधिकारी/कर्मचारी यांचेकडे उपलब्ध आहे. त्यांचेकडून प्राप्त करुन घेणेसाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (४) अन्वये आपण त्यांच्या सहाय्याची मागणी केली होती का? त्यावेळी त्यांनी अशी मागणी आपण केली नसल्याचे तोंडी सांगितले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत लक्ष्मण सोनारे, प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा हा खुलासा लक्षात घेता, सदरची माहिती ही शिक्षण विभागात उपलब्ध नव्हती असे दिसून येते. ती ज्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध होती त्यांचेकडून ती आपणास प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी तत्कालीन आयुक्तांकडे टिप्पणी सादर केली होती. मात्र आयुक्तांनी आदेश देऊनसुध्दा तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी सदरची माहिती त्यांना दिलेली नाही, असे श्री.भरत सोनारे यांचे म्हणणे आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियमांतर्गत ज्यावेळी एखादी माहिती मागण्यात येते त्यावेळी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांचेतर्फे मागणी करण्यात आलेली माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे उपलब्ध असेल, त्यांना लेखी विनंती करुन त्यांचेकडून ती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारे लेखी विनंती केल्यानंतर सुध्दा संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरवून सहाय्य केले नाही, तर माहिती देण्यास झालेल्या विलंबासाठी अशा सहाय्य न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दोषी धरता येईल. तथापि या प्रकरणी श्री.भरत सोनारे यांनी अशा प्रकारे दुसऱ्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांच्या सहाय्याची मागणी केली होती असे दिसून येत नसल्याने, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यास झालेल्या विलंबाची संपूर्ण जबाबदारी श्री.भरत सोनारे यांचेवर येते. त्यामुळे त्यांचा खुलासा मान्य करण्यात येत नाही.

आयोगाच्या दि.०५.०५.२०२५ रोजीच्या आदेशानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना त्यांनी आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशानंतर देखील तक्रारकर्ता यांना माहिती पुरविली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि.२७.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रदिर्घ खुलासा सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले की, शिक्षण विभागात सन २०१८ पासून खाजगी शाळांचे विविध विषय तत्कालीन इतर लिपिक हाताळत होते. माहे मार्च २०२५ पासून उपायुक्त व सहा.आयुक्त यांच्या मौखिक आदेशानुसार खाजगी शाळांची काही प्रकरणे ते हाताळत आहेत. त्यामुळे खाजगी शाळांविषयी पूर्वीचे कामकाज, कार्यवाही, प्रक्रिया, निर्णय व इतर संबंधित कामकाज त्यांचेकडे नसल्याने याबाबत ते अनभिज्ञ/अपरिचित आहेत. या अनुषंगाने खाजगी शाळांबाबत त्यांना फारसा अनुभव नाही. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका सेवेत ते सन २०१६ पासून अनुकंपा तत्वावर 'लिपीक वर्ग ३' या पदावर कार्यरत आहे. माहे जून २०२२ पासून आयुक्त यांच्या आदेशान्वये त्यांना प्रभारी प्रशासकीय अधिकारी, वर्ग३ या पदावर नियुक्त केले आहे. सदरचा कार्यभार हा प्रभारी असून या पदाबाबत कोणतेही अधिकार त्यांना प्राप्त नाहीत. लिपीक दर्जाचे काम ते विभागात करीत आहेत. तसेच आयुक्त यांचे आदेशानुसार त्यांचेकडे लेखा विभागाचा अतिरिक्त कार्यभार आहे. कामांची व्याप्ती व स्वरुप पाहता, ३७० शाळांचे विविध कामकाज पाहता आपणास शिक्षण विभागात पुर्ण वेळ देता येत नाही याबाबत त्यांनी वरिष्ठांना निदर्शनास आणून दिले आहे.

श्री.विजय वाकडे आपल्या खुलाश्यात पुढे असेही म्हणतात की, माहितीचा अधिकार अंतर्गत महानगरपालिकेच्या विविध विभागात 'माहिती अधिकारी' या पदावर 'विभाग अधिकारी' यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांना विशेष अधिकार असतात, अनुभव असतो, ज्ञान असते, कला असते, सदर अधिकारी हे किमान वर्ग २ चे अधिकारी असतात. उपायुक्त व तत्सम पदावरील वर्ग-१ चे अधिकारी प्रथम अपिलीय अधिकारी असतात. परंतु आदेशानुसार वर्ग-३ च्या प्रभारी प्रशासकीय अधिकारी ज्यांना कोणतेही अधिकार प्रदान केलेले नसताना त्यांची मनुष्यबळ अभावी शिक्षण विभागात माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करणे योग्य वाटत नाही. माहिती अधिकारी हे पद फार महत्वाचे आणि जबाबदारीचे पद आहे. यासाठी अनुभव, ज्ञान, प्रशिक्षण, अधिकार इ.ची आवश्यकता आहे. सहा.आयुक्त यांची विभाग अधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार दिल्याने तसेच त्यांच्याकडे इतर विभागांचा कार्यभार देखील असल्याने, त्यांना ह्या विभागास पुरेसा वेळ देता येत नाही. विभागात आदेशानुसार सहा.माहिती अधिकारी देखील RTI बाबत लक्ष देत नाही. सहाय्य करीत नाहीत. वारंवार सांगूनही याबाबत कोणतीही मदत/सहकार्य मिळत नाही. त्यामुळे परिस्थितीमुळे विहीत मुदतीत माहिती तयार करुन देणे शक्य होत नाही.

माहितीचा अधिकार अंतर्गत काही अर्जदार हे विनाकारण, कोणताही संबंध नसताना, सामाजिक हित नसताना स्वत:च्या फायद्यासाठी खूप वेळा अर्ज करतात. ३००-३५० शाळांची संपूर्ण माहिती मागतात. शाळांना ब्लॅकमेल करतात, आर्थिक लाभाची मागणी करुन स्वहित साधतात. यामुळे कार्यालयाचा नाहक किंमती वेळ, उर्जा, स्टेशनरी वाया जाते. याबाबत काही पावले उचलणे आवश्यक आहे असेही आपल्याला वाटते असे मत श्री.वाकडे यांनी व्यक्त केले आहे. प्रत्येक शाळेची किमान सरासरी माहिती १५०-२०० पाने असतात. जर ३७० शाळांची माहिती मागीतली तर तेवढी पाने, तेवढा छपाई खर्च, कागदांचा वापर, वेळ सर्व काही विचारात घेणे आवश्यक आहे. या माहितीचे ते शेवटी काय करणार? Self Finance शाळा या RTI ची माहिती देण्यास नकार देतात. अशा शाळांची संख्या अंदाजे ३००+ आहे. या शाळा RTI अर्ज स्विकारत देखील नाही. खाजगी शाळांबाबत RTI अंतर्गत परिपत्रक देण्यात आले आहे. परंतु वापर होताना दिसून येत नाही. काही शाळांकडे कायद्यातील तज्ञ व्यक्ती नियुक्त असतात. काही शाळा राजकारणी मंडळींच्या आहेत. त्या शाळा माहिती देण्यास नकार देतात ही वस्तुस्थिती आहे. असेही त्यांनी खुलाश्यात नमूद केले आहे.

श्री. वाकडे पुढे असेही नमूद करतात की, शिक्षण हक्क कायदा २००९ मध्ये विविध कलमांतर्गत शाळांसाठीचे नियम ठरवून दिलेले आहे. यातील काही गोष्टींची पूर्तता करणे सर्व शाळांना शक्य नाही. काही नियमांना बगल देऊन विद्यार्थ्यांसाठी शासन सदर नियम शिथिल करुन परवानगी/मान्यता/पुनर्मान्यता/सेवा सुविधा देतात. सदर बाब माहितीचा अधिकारी अंतर्गत विचारणा होते. या गोष्टी शासन स्तरावरील असल्याने याबाबत माहिती अधिकारी म्हणून कारवाई होणे अशक्य आहे.विहित मुदतीत शाळा माहिती देत नसल्याने/ नकार देत असल्याने अर्जदार यांना माहिती देण्यास अडथळा येतो. विद्यार्थी/शिक्षक/कर्मचारी याबाबत वैयक्तिक माहिती देताना फार विचार करावा लागतो. खाजगी शाळांच्या फी बाबतचा मुद्दा RTI मध्ये वारंवार विचारणा होते. याबाबत शासन निर्णय असून शाळा स्तरावर, शासनस्तरावर, विविध समितींच्या माध्यमातून शाळा फीबाबत निर्णय घेते.

आपल्या खुलाश्यात त्यांनी पुढे असेही नमूद केले की, कार्यालयाने शिक्षण विभागातील सर्व उपलबध नस्तींचे वर्गीकरण करुन अ, ब, क, ड गठ्ठा पध्दत करण्यासाठी काम सुरु केले आहे. उपलब्ध दस्तावेजांमध्ये खाजगी शाळांच्या काही जुन्या फाईल्सचा समावेश आहे. पत्रान्वये काही शाळांनी मुद्देनिहाय माहिती सादर केली आहे. उर्वरित शाळांकडून माहिती संकलन करुन घेण्यासाठी सर्व केंद्रप्रमुख, समग्र शिक्षाचे कर्मचारी तसेच शाळांचे मुख्याध्यापक यांना सुचना केल्या आहे. त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदर नस्तींचे स्कॅनिंग करुन मिळणेबाबत पालिकेचा संबंधित विभागाला कळविले आहे. सन २०२२ पर्यंत या विभागात अवघे ०२ लिपीक कर्मचारी कार्यरत होते. मनुष्यबळ अभावी कामांची व्याप्ती व स्वरुप पाहता कामांचा निपटारा करण्यासाठी अडचणी येत होत्या. विभागात फाईल्स स्कॅन करण्यासाठी स्कॅनर उपलब्ध नव्हते. महानगरपालिकेतर्फे आता लहानसे स्कॅनर प्राप्त झाले आहे. खाजगी शाळांच्या फाईल्स स्कॅन करुन ठेवण्यासाठी, साठवणीसाठी संगणक यंत्रात विशेष सोय नाही. महानगरपालिकेडे पाठपुरावा सुरु आहे. इतक्या शाळांच्या उपलब्ध फाईल्स झेरॉक्स करुन देण्यासाठी वैयक्तीक पातळीवर आर्थिक ताण पडणार आहे. मागील एक आठवडा उपलब्ध फाईल्सचे अवलोकन करण्यासाठी अर्जदार यांना वारंवार विनंती करुनही अर्जदार उपस्थित राहत नाहीत. त्यामुळे त्यांना नेमक्या कोणत्या शाळांची माहिती हवी आहे. हे समजून येत नाही. झेरॉक्स मशीन मागील १ वर्षापासून बंद अवस्थेत आहे. त्यामुळे नस्तींच्या प्रती काढण्यात अडचण येत आहे. याबाबत विभागास कळविले आहे. पालिकेने सन २०२२ मध्ये विभागाचा स्कॅन केलेला डेटा करप्ट झाल्याने आता पुन्हा देण्यात आला आहे.

श्री.विजय वाकडे यांनी आपल्या खुलाश्यामध्ये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांसबंधी असे म्हटले आहे की, शाळांच्या सदर मान्यता, पुनर्मान्यता, शाळा भेटी व तपासणी स्ट्रक्चर ऑडीट, फायर ऑडीट, इलेक्ट्रीक ऑडीट, नॅशनल बिल्डींग कोड प्रमाणपत्र (NBC), अनधिकृत शाळा पाहणी, शाळेतील सोयी-सुविधा, शाळा स्तरावरील विविध समित्या, शाळा बैठका, फी वाढ बाबत तक्रारी RTE नियमांचे पालन, शाळा स्थलांतर, शाळांबाबत तक्रारी इत्यादी सर्व बाबी या शिक्षण अधिकारी यांच्या स्तरावरील विषय आहेत. आपल्याकडे प्रभारी प्रशासकीय अधिकारी म्हणून चार्ज असला तरी वरील गोष्टींचे कोणतेही अधिकार त्यांना प्रदान नाहीत. फक्त पद दिले आहे, अधिकार नाहीत. असा ही आक्षेप त्यांनी घेतला आहे.

मागील काही वर्षापासून तक्रारकर्ता श्री.विनित शाह यांच्या पत्रांवर कार्यवाहीसाठी शिक्षण अधिकारी/विभाग अधिकारी यांना वारंवार समक्ष भेटून अर्जदार यांनी शाळांवर कारवाईसाठी लक्ष वेधले आहे. खाजगी शाळा हा विषय त्यांच्याकडे यापूर्वी नसल्याने तत्कालीन अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या पत्रांना RTI यांना उत्तरे दिली आहेत किंवा कसे याबाबत उपलब्ध RTIनस्तीमध्ये निश्चित माहिती आढळून येत नाही.माहे जून २०२२ पासून विभागात माहिती अधिकारी यांचेसह सहा.जन माहिती अधिकारी यांचीही नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर अधिकारी/कर्मचारी यांचेकडून माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे सहकार्य, मदत मिळत नसल्याचे वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.

दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये काही खाजगी शाळांची माहिती कार्यालयास प्राप्त झाली आहे. परंतु नगरभवन येथील शिक्षण विभाग कार्यालयाच्या इमारती खालील भूभाग तलाव नजीक असल्यामुळे मोठ्या प्रमाणात खचला असल्याने, आयुक्त यांच्या आदेशानुसार सदर इमारतीची तज्ञांच्या मदतीने पाहणी करुन सदर इमारत धोकादायक असल्याने अधिकारी व कर्मचारी यांच्या जिविताला धोका संभवू नये म्हणून विभागाचे स्थलांतर करण्यता आले आहे. जुन्या इमारतीत शिक्षण विभाग कार्यालयात सर्व दस्तावेज, नस्ती, कागदपत्र, अडकून राहिल्याने संबंधित अर्जदार यांना शाळांकडून प्राप्त नस्तींचे अवलोकन करण्यास अडचण येत आहे. आदेशानुसार धोकादायक इमारतीत कोणालाही प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. परिस्थिती सुधारल्या नंतर अर्जदार यांना समक्ष बोलावून कार्यालयात उपलब्ध असलेली अपेक्षित माहिती देण्यात येईल, असेही म्हटले आहे.

तक्रारकर्ता यांनी खाजगी शाळांबाबत विविध विषयांची सखोल माहिती मागीतली आहे. सदर उपलब्ध असलेली माहिती संकलित करुन त्यांना विनाशुल्क देणेबाबत आयोगाने आदेशित केले आहे. आदेशानुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती सबंधितांना देण्यासाठी पुरेसा अवधी मिळावा यासाठी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगाला या खुलाश्याद्वारे विनंती केलेली आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा हा प्रदिर्घ खुलासा लक्षात घेतला असता, असे दिसून येते की, त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केल्याबाबत त्यांचा आक्षेप आहे. ते

कनिष्ठ दर्जाचे कर्मचारी असल्यामुळे जन माहिती अधिकारी म्हणून कर्तव्य बजावताना इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्यांना योग्य तो सहाकार्य मिळत नाही असे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. तथापि त्यांचा इतर खुलासा पाहिला असता, तो कदाचित याप्रकरणसंबंधाने त्यांनी केलेला आहे, असे दिसून येत नाही. याप्रकरणी तक्रारकर्ता यांनी त्यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या एकूण ११ प्रथम अपिलांवर दि.०७.०२.२०२० रोजी झालेल्या सुनावणीमध्ये पारित केलेले आदेश व त्या आदेशाच्या अनुषंगाने झालेली कार्यवाही याबाबतची माहिती मागीतली होती. ही माहिती १५ दिवसांमध्ये नि:शुल्क पुरवावी असे आदेश आयोगाने दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिलेले आहेत. ज्या कालावधी मध्ये विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थी यांना दिलेली नाही व आजपर्यंत ती त्यांना दिलेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. ती देण्यास का विलंब झाला याबाबत श्री.विजय वाकडे यांनी त्यांचे खुलाश्यात काहीही नमूद केलेले नाही. त्याबाबतचा उल्लेख करण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळलेले आहे व त्यांचे खुलाश्यामध्ये त्यांनी इतर संबंध नसलेल्या बाबींचा उहापोह केलेला आहे. म्हणजेच आयोगाच्या आदेशानंतर देखील माहिती देण्यास त्यांना का अपयश आले याबाबत ते काहीच नमूद करत नाही. याऊलट खाजगी शाळा त्यांना कशा जुमानत नाहीत. त्या कशाप्रकारे फीची आकारणी करतात. त्यांचे व्यवस्थापन कसे राजकारणी व्यक्तींच्या हाती आहे. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मागणारे अर्जदार कशाप्रकारे शाळांना ब्लॅकमेल करतात, इत्यादि संबंधीत नसलेल्या बाबींचा त्यांनी विस्ताराने उहापोह केला आहे. त्यामुळे त्यांचा हा खुलासा अमान्य करण्यात येत आहे.

या विशिष्ट प्रकरणी श्री.विजय वाकडे यांचा खुलासा अमान्य करण्यता आला असला, तरी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांकडे पुर्णपणे दुर्लक्ष करणे आयोगाला शक्य नाही. ते जव्हा हे म्हणतात की, ते कनिष्ठ पदावर कार्यरत असून, त्यांना जन माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार महानगरपालिकेने दिलेला आहे. त्यावेळी त्यांच्या या व्यथेकडे आयोगाला दुर्लक्ष करता येत नाही. राज्य शासनाने वेळोवेळी आदेश परिपत्रके काढून सर्व सार्वजनिक प्राधिकरणाना सुचित केले आहे की, जन माहिती अधिकारी या पदावर नियुक्ती करताना संबंधित अधिकारी हा किमान वर्ग २ चा अधिकारी असावा. याप्रकरणी असे घडलेले दिसत नाही. कनिष्ठ लिपीक दर्जाचे अधिकारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केल्याने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्ज करणात्या अर्जदारांना कशाप्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते. तसेच जन माहिती अधिकारी यांना देखील कशा प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते याचे हे प्रकरण म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे. सार्वजनिक प्राधिकारणाचे प्रशासन हे राज्य शासनाच्या आदेशाकडे सुध्दा तितक्याश्या गांर्भियाने पाहत नसल्याने, कार्यालयातील सर्वात कनिष्ठ कर्मचाऱ्याला जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले जाते व परिणामी माहिती अधिकाराची अंमलबजावणी अशा कर्मचाऱ्यांना येणाऱ्या मर्यादांमुळे योग्य रितीने होत नाहीत.

याप्रकरणी तर जन माहिती अधिकारी हे आयोगाने द्वितीय अपिलामध्ये आदेश दिल्यानंतर देखील चार महिन्यानंतरसुध्दा त्याची अंमलबजावणी करण्यास अपयशी ठरले आहेत. या अपयशाचे धनी केवळ त्या जन माहिती अधिकारी यांना धरता येणार नाही. तर त्यासाठी यापदावर त्यांची नियुक्ती करणारी महानगरपालिका सुध्दा तितकीच दोषी आहे असे आयोगाचे मत आहे. कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याला जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केल्याने माहिती मिळण्यास विलंब झालेला आहे असे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे प्रकरणातील तक्रारकर्ता हे त्यांना झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासाठी नुकसानभरपाई मिळण्यास सुध्दा पात्र आहेत. असे आयोगाचे मत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत लक्ष्मण सोनारे, प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेला खुलासा असमाधानकारक असून, त्यांचा खुलासा अमान्य करण्यात येत आहे. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्याकलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये प्रत्येकी रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

   सदर रक्कम त्यांचे वेतनातून ०२ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र.००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षा खाली जमा करावी. याबाबतची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल उपायुक्त (शिक्षण), मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगास सादर करावा.

२. मिरा भाईंदर महानगरपालिका या प्राधिकरणाने कनिष्ठ लिपीक दर्जाचे अधिकारी यांना जन माहिती अधिकारी या पदावर नियुक्त केल्यामुळे, अपिलार्थीना यांना माहिती मिळण्यास विलंब झाला आहे. तसेच अपिलार्थी यांना माहिती मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई म्हणून मिरा भाईंदर महागनरपालिका या प्राधिकरणाद्वारे अपिलकर्त्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात येत आहे. सदर रक्कम मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने अपिलार्थीस धनादेशाद्वारे अदा करावी व कार्यपुर्ती अहवाल आयोगास सादर करावा.

३. शासनाचे तसेच आयोगाचे आदेश लक्षात घेऊन, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे जन माहिती अधिकारी या पदावर किमान वर्ग-२ पदाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करतील अशी अपेक्षा आहे. त्यांनी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.१०.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

१. सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२. उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्यालय, भाईंदर,ता.जि.ठाणे.

४. उप आयुक्त, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

५. आहरण व संवितरण अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

६. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भारत सोनारे, प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विजय वाकडे,
प्रशासकीय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगर भवन), मांडली तलाव,
दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१. **यांचे मार्फत रवाना.**

**सुनावणी दिनांक २९.१०.२०२५ ( In Continuation of order dt. ०४.०६.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.३०.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणास अपिलार्थी यांना नुकसानभरपाई अदा करणेबाबत व जन माहिती अधिकारी या पदावर किमन वर्ग-२ पदाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की, आयोगाने दि.१७.०२.२०२५ रोजी स्पष्ट आदेश देऊनही अद्यापपर्यंत त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती का देण्यात आलेली नाही. याबाबत श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगासमोर शपथपत्र सादर करणे योग्य होईल.

तसेच आयोगाने दि.३०.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणास अपिलार्थी यांना रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई अदा करणेबाबत आदेशित केले होते. ती रक्कम देखील त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे सदर रक्कम अपिलार्थी यांना १५ दिवसांच्या आत पुरविणे योग्य होईल. व सदर रक्कम अपिलार्थी यांना पुरविल्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिकेने आयोगासमोर सादर करणे योग्य होईल.

तसेच आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे जन माहिती अधिकारी या पदावर किमान वर्ग-२ पदाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करतील असे आयोगाने आपल्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये आदेशित केले होते. त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगासमोर सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगाने दि.१७.०२.२०२५ रोजी माहिती पुरविणेबाबत आदेश देऊनही, अद्यापपर्यंत अपिलार्थी यांना माहिती का पुरविण्यात आलेली नाही. याबाबतचे शपथपत्र पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर सादर करावे.

२. मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने आयोगाच्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या आदेशानुसार अपिलार्थी यांना रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई अदा केलेली नसल्यामुळे, सदर नुकसानभरपाई पुढील १५ दिवसांच्या आत अपिलार्थी यांना अदा करुन, त्याबाबतचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगासमोर सादर करावा.

३. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे जन माहिती अधिकारी या पदावर किमान वर्ग-२ पदाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करतील असे आयोगाने आपल्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या आदेशामध्ये आदेशित केले होते. त्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील सुनावणीच्या वेळी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आयोगासमोर सादर करावा.

४. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.०२.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

आयुक्त, मिरा भाईंदर महागनरपालिका,
मुख्यालय, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी),
शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
(नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला, भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

**सुनावणी दिनांक १६.०२.२०२६ ( In Continuation of order dt. २९.१०.२०२५)**

**विवेचन**

उपरोक्त दि.२९.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणास अपिलार्थी यांना नुकसानभरपाई अदा करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०२.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत लक्ष्मण सोनारे व श्री.विजय रा.वाकडे, प्रभारी प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आयोगाच्या दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये तक्रारकर्ता यांना १५ दिवसांच्या कालावधीत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. तथापि अद्यापपर्यंत त्यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी यासंदर्भात असे निवेदन केले की, तकारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. अशी परिस्थीती असल्यास माहिती उपलब्ध नसण्यासाठी किंवा गहाळ होण्यासाठी जे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेवर आतापर्यंत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक होते. तथापि तशी कार्यवाही देखील अद्यापपर्यंत झालेली नाही.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने अद्यापपर्यंत तक्रारकर्ता यांना रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई दिलेली नाही. ती आता तक्रारकर्ता यांना अदा करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतर देखील अद्यापपर्यंत माहिती न दिल्याबाबत सहा.आयुक्त, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी याबाबत जबाबदारी निश्चित करुन, उचित कार्यवाही करावी व तसा अहवाल आयोगासमोर पुढील सुनावणीचया वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाने तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशाप्रमाणे रु.२५,०००/- इतकी नुकसानभरपाई दिलेली नाही. त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाद्वारे तक्रारकर्ता यांस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(८)(ख) अंतर्गत रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी नुकसान भरपाई पुढील १५ दिवसांच्या कालावधीमध्ये धनादेशाद्वारे अदा करावी व तसा कार्यपूर्ती अहवाल आयोगासमोर पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.०३.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
आयुक्त, मिरा भाईंदर महागनरपालिका,
मुख्यालय, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

सहा.आयुक्त, शिक्षण विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,
(नगर भवन), मांडली तलाव, दुसरा मजला,
भाईंदर (प), ता.जि.ठाणे ४०१ १०१.

## सुनावणी दिनांक २३.०३.२०२६ ( In Continuation of order dt. १६.०२.२०२६)

## विवेचन

उपरोक्त दि.१६.०२.२०२६ रोजीच्या आदेशान्वये सहा.आयुक्त (शिक्षण), मिरा भाईंदर महानगरपालिका यांना अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २३.०३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (अति.कार्यभार शिक्षणाधिकारी), शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.भरत लक्ष्मण सोनारे व श्री.विजय रा.वाकडे, प्रभारी प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.विश्वास हिरे, प्र.प्रशासकिय अधिकारी, शिक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगाने दि.१७.०२.२०२५ रोजीच्या आदेशानुसार अपिलाथी यांना १५ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्याने दि.१६.०२.२०२६ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी सहा.आयुक्त (शिक्षण), मिरा भाईंदर महानगरपालिका यांना संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले होते. या अनुषंगाने श्रीम.दिपाली जोशी, सहा.आयुक्त (शिक्षण), मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या दि.१८.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, आयोगाच्या आदेशानंतर कार्यवाही प्रस्तावित असून, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळाल्यानंतर आयोगास कळविण्यात येईल. यावरुन असे दिसून येते की, अद्यापपर्यंत जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही सुरु झालेली नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांना माहिती सुध्दा देण्यात आलेली नाही.

या प्रकरणातील सहा.आयुक्त (शिक्षण), मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दाखवलेला निष्काळजीपणा आक्षेपार्ह आहे. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत अर्जदरांना माहिती देण्यासंदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील अधिकारी गंभीर नाहीत, असे इतरही प्रकरणात आढळून आलेले आहे. अपिलार्थी यांना त्यांनी अर्ज दाखल केल्यानंतर ३० दिवसांच्या कालावधीमध्ये माहिती तर देण्यात आली नाहीच, परंतु त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर आदेश देखील पारित

केले नाहीत. आयोगाने माहिती देण्याचे आदेश दिल्यानंतर एका वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्यानंतर सुध्दा अपिलार्थी यांना कोणतीही माहिती दिली नाही.

इतर काही प्रकरणात मिरा भाईंदर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाला अपिलार्थी यांना नुकसानभरपाई देण्याबातचे देखील आदेश दिले आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती देखील लावण्यात आली आहे. त्यानंतर देखील शिक्षण विभागाचे अधिकारी यासंदर्भात गंभीर नसल्याचे आढळून आल्यामुळे याप्रकरणी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी स्वत: लक्ष घालणे आवश्यक आहे असे दिसून येते. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी याप्रकरणात स्वत: लक्ष घालून अपिलार्थी यांना माहिती प्राप्त होईल हे पहावे व तसा अहवाल त्यांच्या स्वाक्षरीने पुढील सुनावणीच्या वेळी त्यांनी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. प्रकरण पुढील तारखेवर आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्या अहवालासाठी ठेवण्यात येत आहे.
२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२९.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २३ मार्च, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
आयुक्त, मिरा भाईंदर महागनरपालिका,
मुख्यालय, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०१ १०१.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ

संगणक-११